कर सहायक गट-क-2014
परीक्षेचा दि : 22/02/2015

# A

2015

CODE : UO5

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.

प्रश्नपुस्तिका

## मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुद्धिमत्ता चाचणी आणि पुस्तपालन व लेखाकर्म

वेळ : 2 ( दोन ) तास

एकूण प्रश्न : 200
एकूण गुण : 400

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 200 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

1. '<u>ज्याला</u> कर नाही <u>त्याला</u> डर कशाला?' अधोरेखित सर्वनामाचा प्रकार सांगा.
(1) दर्शक सर्वनाम (2) संबंधी सर्वनाम (3) प्रश्नार्थक सर्वनाम (4) सामान्य सर्वनाम

2. पुढीलपैकी कंठ्य वर्ण ओळखा.
(1) छ्, ज्, झ् (2) ठ्, ड्, ढ् (3) ख्, ग्, घ् (4) थ्, द्, न्

3. योग, रूढी, योगरूढ हे कोणत्या शब्दशक्तीचे प्रकार आहेत?
(1) अभिधा (2) लक्षणा (3) व्यंजना (4) गौणी

4. खालीलपैकी संबंधवाचक शब्दयोगी अव्यय कोणते?
(1) विषयी (2) योगे (3) संगे (4) साठी

5. पुढील पर्यायातून 'तद्भव' शब्द निवडा.
(1) प्रीति (2) यथामति (3) गाव (4) तिकिट

6. 'ज्याच्या हाती ससा, तो पारधी' ही म्हण पुढीलपैकी कोणत्या वेळी समर्पक आहे?
(1) चोर एकाने पकडला, छायाचित्र दुसऱ्यासोबत काढले गेले.
(2) चोर सापडल्यावर जमलेल्यांनी त्याला चोप दिला.
(3) पळताना सापडला म्हणून तो चोरच, असे ठरले.
(4) पकडल्यावर चोराची भितीने गाळण उडाली.

7. "आग्रही" याच्या विरुद्धार्थी शब्द पुढीलपैकी कोणता?
(1) विग्रही (2) दुराग्रही (3) ग्रहविरहीत (4) अनाग्रही

8. 'वायस' या शब्दाचा समानार्थी अचूक शब्द कोणता?
(1) विवंचना (2) वासर (3) कावळा (4) वृक्ष

9. 'प्रमाण' या शब्दास पुढील अर्थ आहेत.
(a) पुरावा, आधार, प्रत्यंतर
(b) माप, परिमाण, पातळी
(c) आदर्श, नमुना, मापक
(d) परिणाम, कार्यकारण, निष्पत्ती

**पर्यायी उत्तरे :**
(1) (a), (b) व (c) (2) (b), (c) व (d) (3) (b) व (c) (4) (a) व (b)

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**10.** योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | सिद्ध शब्द | (i) | जनता |
| (b) | साधित शब्द | (ii) | उपहार |
| (c) | उपसर्गघटित शब्द | (iii) | बस |
| (d) | प्रत्ययघटित शब्द | (iv) | करून |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (2) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (iii) | (i) | (ii) | (iv) |

---

**11.** पुढील वाक्यातील प्रयोगाचा प्रकार ओळखा.
'तिने पत्र लिहिले.'
(1) कर्मणि प्रयोग (2) भावे प्रयोग (3) कर्तरी प्रयोग (4) मिश्र प्रयोग

---

**12.** पुढीलपैकी देशी किंवा देशज शब्द कोणता ?
(1) बस (2) कान (3) पृथ्वी (4) ढेकूण

---

**13.** पुढील शब्दसमूहातील ध्वन्यार्थ ओळखा.
'हात कापून देणे'
(1) मदत करणे (2) लेखी करार करून देणे
(3) धीर सोडणे (4) हात आखडणे

---

**14.** दिलेल्या शब्दासाठी समानार्थी शब्द ओळखा.
'धुरीण'
(1) नेता (2) धूळ (3) स्थीर (4) अग्नी

---

**15.** 'थंडी फार पडली आहे.' व 'रस्त्यावर फारशी रहदारी नाही.' या दोन वाक्यांचे केवल वाक्य करण्यासाठी पुढीलपैकी कशाचा उपयोग करावा लागेल ?
(1) म्हणून (2) कारण (3) त्यामुळे (4) मुळे

---

**16.** 'वादविवादामध्ये पाहुण्या विद्वानांनी आधी आपली भूमिका मांडली.'
याऐवजी पुढील प्रमाणे शब्द योजना करता येईल :
(1) विद्वानांनी पूर्वमीमांसा केली. (2) विद्वानांनी पूर्वपीठिका मांडली.
(3) विद्वानांनी पूर्वपक्ष मांडला. (4) विद्वानांनी पूर्वपाठ सांगितला.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

17. 'आमचे शरीर सुदृढ व्हावे म्हणून आम्ही योगासने करतो.' या मिश्र वाक्यातील अव्यय गौणत्वबोधक उभयान्वयी अव्ययाच्या कोणत्या प्रकारातील आहे ?

(1) उद्देशबोधक (2) कारणबोधक (3) स्वरूपबोधक (4) संकेतबोधक

18. 'निभृत' म्हणजे :

(1) ऱ्हस्व उच्चार (2) दीर्घ उच्चार (3) लांबट उच्चार (4) तोकडा उच्चार

19. पुढीलपैकी 'वर्त्स्य ध्वनी' कोणाला म्हणतात ?

(1) कंठ्य (2) तालव्य (3) दंततालव्य (4) मूर्धन्य

20. 'समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजे' या वाक्याद्वारे व्यक्त होणारा अर्थ कोणता ?

(1) वाच्यार्थ (2) लक्ष्यार्थ (3) तात्पयार्थ (4) व्यंग्यार्थ

21. पुढीलपैकी 'वैकल्पिक द्वंद्व समास' चे उदाहरण कोणते ?

(1) न्यायान्याय (2) नीलकंठ (3) विटीदांडू (4) हरिहर

22. रंग + छटा = ?

(1) रंगछटा (2) रंगच्छटा (3) छटारंग (4) यापैकी नाही.

23. वाक्यात येणाऱ्या प्रत्येक शब्दाची व्याकरणविषयक संपूर्ण माहिती सांगता येणे याला काय म्हणतात ?

(1) उपपदविभक्ती (2) उपपदार्थ (3) अधिकरण (4) पदपरिस्फोट

24. 'काय अक्षर आहे त्याचे !' या उद्गारार्थी वाक्याचे अचूक विधानार्थी वाक्य तयार करा.

(1) त्याचे अक्षर खूप सुंदर आहे. (2) त्याचे अक्षर फार सुंदर आहे.

(3) त्याचे अक्षर फार फार सुंदर आहे. (4) त्याचे अक्षर अतिशय सुंदर आहे.

25. पुढीलपैकी कोणत्या गटातील शब्द परभाषिक आहेत ?

(1) हिय्या, काज, रान (2) सतरंजी, पालखी, किंमत

(3) बहीण, चाक, ऊन (4) कर्ण, अरण्य, देवालय

26. पुढील पर्यायातून अंशाभ्यस्त शब्द ओळखा.

(1) समोरासमोर (2) एकेक (3) साजशृंगार (4) मधूनमधून

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**27.** 'दिक् + मूढ' यांचा संधी काय होतो ?

(1) दिक्मूढ (2) दिग्मूढ (3) दिङ्मूढ (4) वरीलपैकी एकही नाही.

**28.** 'वडलेला' याअर्थी साधित विशेषण बनवावयाचे असल्यास पुढीलपैकी कोणता प्रत्यय उपयोगात आणावा ?

(1) 'इक' (2) 'इत' (3) 'ऊ' (4) 'ईव'

**29.** ''मोठ्या कामात बारीक काम उद्‌भवणे' या अर्थाचा वाक्प्रचार कोणता ?

(1) शेंडीस फुले बांधणे (2) शेंडी हातात सापडणे (3) शेंडी फुटणे (4) शेंडी गुंतणे

**30.** शुद्धलेखन नियमानुसार अचूक असलेला पर्याय निवडा.

(1) सुश्रूषा (2) शूश्रूषा (3) शुश्रूषा (4) शुश्रुषा

**31.** भजन करा सावकाश। तुका झालासे कळस. यांतील सावकाश हे __________ अव्यय आहे.

(1) गतिदर्शक क्रियाविशेषण (2) स्थितिदर्शक क्रियाविशेषण

(3) रीतिवाचक क्रियाविशेषण (4) कालवाचक क्रियाविशेषण

**32.** दिलेल्या पर्यायातून पुढील शब्दासाठी विरुद्धार्थी शब्द कोणता ?

'भंजक'

(1) भयाण (2) भंगूर (3) विध्वंसक (4) निर्माता

**33.** पुढीलपैकी अरबी शब्द कोणते ?

(1) पगार, बटाटा, हापूस (2) सामान, अत्तर, कामगार

(3) खाना, हकीकत, पेशवा (4) अर्ज, जाहीर, मालक

**34.** योग्य पर्याय निवडा.

(a) शब्दाच्या मूळ रूपाचे बदललेले रूप म्हणजे विकृती होय.

(b) प्रकृतीला प्रत्यय लागून जे रूप तयार होते त्याला विकृती म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) दोन्ही बरोबर (2) (a) आणि (b) दोन्ही चूक

(3) फक्त (a) बरोबर (4) फक्त (b) बरोबर

**35.** 'आम्ही जातो आमुच्या गावा' या वाक्यातील उद्देश्य कोणते ?

(1) गावा (2) आम्ही (3) जातो (4) आमुच्या

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

खालील उतारा वाचून प्रश्न क्र. **36** ते **40** ची उत्तरे लिहा :

पाऊलवाटेचे मला नेहमीच आकर्षण वाटते. ती आपोआप निसर्गनियमाने घडलेली असते. भूमीकन्याच ती. या पाऊलवाटा फक्त माणसांच्याच नसतात. माणूस नव्हता, तेंव्हापासून, पाखरांच्या वेळेपासून या वाटा असणार. पाऊलवाट म्हणजे प्राण्यांच्या संदर्भात जवळची वाट. घनदाट अरण्यातून, विमुक्त माळावरून, राहत्या जागेपासून पाणोठ्यापर्यंत जाणारी, पाखरांची घरटी जवळ करणारी. तशीच माणसांचीही, या पाऊलवाटांना 'आदिवाटा' असेच म्हणतात.

ही पाऊलवाट निसर्गाचाच एक भाग असल्याने त्याचेच गुणधर्म तिला मिळाले आहेत. तीही तशीच आत्ममग्न, तशीच गूढ आणि तशीच मनस्वी असते. या पाऊलवाटेवरून मी चालू लागले, की आपोआपच मी आत्ममग्न होते. दु:खाने, काळजीने नव्हे, तर एका अवर्णनीय सुखाने, निसर्गातील आपले आपलेपण गवसल्याने, भोवतालच्या उन्हावाऱ्यात आपणच सामावून जातो. पावसात बुडतो आणि धुक्यात त्या वाटेबरोबर आपणही हरवून जातो ... एक चालती समाधीच असते ती.

या पाऊलवाटांचे गूढपण मला आगगाडीतून प्रवास करताना दिसते. खिडकीशी बसावे आणि फक्त पाऊलवाटा बघाव्यात. कुठे कुठे जातात आणि पुढे दिसत नाहीशा होतात. माळावरच्या पाऊलवाटेने माळणी बाजाराला निघालेल्या असतात. डोंगरावरील दूरच्या पाऊलवाटेवरून गुरांची ओळ चढता-उतरताना दिसते. अरण्यातील वाटांवर कुणीच नसते. एकाकी गूढ अशा त्या अरण्यातूनच दिसत पुढे त्या नाहीशा होतात. आणि त्या पाऊलवाटांचे रंग तरी किती! पिवळ्या, लाल, पांढऱ्या, राखी सावलीने झाकळलेल्या, उन्हाने रसरसलेल्या आणि गंमत ही, की या वाटा आगगाडीशी समांतर अशा नसतात. काटकोनात धावत असतात. या वाटा पाहण्यासाठी तरी आगगाडीतून प्रवास करावा, असे मला अजून वाटते.

ज्याचे बालपण खेड्यात रमले आहे, खेड्याशी एकरूप झाले आहे, तो पुढील आयुष्यात पाऊलवाट विसरत नाही. अमेरिकेचे नागरिकत्व मिळूनही, जेव्हा त्याच्या पायाखाली न्यूयॉर्कजवळील पाऊलवाट येईल, तेव्हा तो नक्कीच आनंदाने उचंबळून येईल. खडक फोडून झरा वर यावा तसा हा आनंद, त्याची विद्वत्ता, त्याचे बहुमान, त्याचे उच्चभ्रूपण आणि त्याची नागरनीती या सर्वांतून वाट काढून वर येईल. ही पाऊलवाट त्याच्या बालपणाच्या पाऊलवाटांना कडकडून भेटेल.

---

**36.** पुढील दोन वाक्ये वाचा.

(a) पाऊलवाट म्हणजे भूमीकन्या, आदिवाट, चालती समाधी.

(b) न्यूयॉर्क मधील पाऊलवाटेवरून चालताना त्याची नागरनीती वाट काढून वर येत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) दोन्ही बरोबर
(2) (a) चूक (b) बरोबर
(3) (a) आणि (b) दोन्ही चूक
(4) (a) बरोबर (b) चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**37.** ज्याचे बालपण खेड्यात गेले आहे, तो आयुष्यात :

(a) कधीच शहरांतील रस्त्यांवरून चालत नाही.

(b) कोणत्याही वाहनातून प्रवास करीत नाही.

(c) पाऊलवाट कधी विसरत नाही.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (c) (2) फक्त (a) (3) फक्त (b) (4) कोणतेही नाही.

---

**38.** पाऊलवाटांच्या उगमकालाबाबत काय म्हटले आहे ?

(a) वेदकाळापासून झालेल्या असाव्यात.

(b) माणूस दोन पायांवर चालायला लागल्यापासून झाल्या असाव्यात.

(c) प्राण्यापाखरांच्या काळापासून असाव्यात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (c) बरोबर, (b) आणि (a) चूक (2) फक्त (b) बरोबर (c) चूक

(3) फक्त (a) बरोबर (4) (b) आणि (c) बरोबर

---

**39.** उताऱ्याला समर्पक शीर्षक कोणते देता येईल ?

(a) आत्ममग्न पाऊलवाट

(b) चाहूलवाट

(c) जागोजागीचे रस्ते

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) फक्त (c) (4) (a) आणि (b)

---

**40.** पाऊलवाटांना गूढ म्हटलेले आहे, कारण :

(a) गूढ अरण्यातून त्या पुढे नाहीशा होतात.

(b) निसर्गच मुळात गूढ आणि आत्ममग्न असतो.

(c) पाऊलवाट समाधीस्त असते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (c) बरोबर (2) (c) आणि (b) बरोबर

(3) (a) आणि (c) बरोबर (4) (a) आणि (b) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**41.** Identify the sentence/s in which noun clause acts as an object.

(a) We decided that we would buy the house.

(b) My theory is that he forged the will.

(c) We cannot provide seats for all who may come.

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (b) and (c) only

(3) (a) only (4) (c) only

**42.** Choose the correct antonymn of pragmatic.

(1) angry (2) unpractical (3) experimental (4) deceitful

**43.** Identify **incorrect** sentence/s.

(a) We may have some coffee ?

(b) Please, you may post this letter for me ?

(c) You may take off your hat, I can't see the screen.

**Answer options :**

(1) (a) only (2) (a) and (b) only

(3) (c) only (4) (a), (b) and (c)

**44.** It became an instant truism that politics meant selfishness.

Substitute the underlined word with a phrase nearest in meaning :

(1) universal belief (2) quick judgement

(3) obvious truth (4) immediate guess

**45.** Are you happy ?

The mood used in this sentence is :

(1) imperative (2) indicative (3) subjunctive (4) none of these

**46.** Choose the correct alternative which would replace the underlined part in the following sentence.

He delivered a speech at once without preparation.

(1) Impulsive (2) Compulsive (3) Expressive (4) Impromptu

**47.** He is contented. He is poor.

Choose the correct combination of simple sentences into one Complex Sentence, containing an Adverb Clause : from the following :

(1) He is contented but he is poor.

(2) He is poor still contented.

(3) He is contented though he is poor.

(4) He is as poor as contented.

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

48. Please vote for the member ________ has done the most for our village.

Select from the choices the best group of words (phrase) to make the sentence grammatically correct.

(1) whom you believe (2) who you believed

(3) that you believe (4) who you believe

---

49. Which part of the sentence below contains an error ?

I never remember (a) to have (b) met this gentleman (c) in Baroda. No error (d)

(1) (a) (2) (b) (3) (c) (4) (d)

---

50. Match the following :

(a) Claustrophobia (i) Unreasonable dislike of foreign people, customs, etc.

(b) Philanthropist (ii) A person who dislikes other people.

(c) Misanthrope (iii) A person who is kind and helpful.

(d) Xenophobia (iv) Fear of being shut up in a small enclosed space.

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (iv) | (iii) | (ii) | (i) |

---

51. Choose the correct sentence/s.

(a) The lecturer could not understand the question.

(b) I could get my B.A. degree although I got ill two weeks before the examination.

(c) I was able to get my B.A. degree although I got ill two weeks before the examination.

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (a) and (c) only

(3) (a), (b) and (c) (4) None of the above

---

52. Select the word which is correctly spelt :

(a) percieve (b) concieve

(c) recieve (d) believe

**Answer options :**

(1) (a) and (d) (2) (b) and (c)

(3) Only (c) (4) Only (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**53.** Which of the following are the **correct** expressions ?

(a) A feather in someone's cap.

(b) A feather in someone's hat.

(c) Feather one's nest.

**Answer options :**

(1) (a) and (b) only (2) (b) only

(3) (a) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

**54.** It had rained before we reached home. Complete the following sentence with the correct alternative.

The word 'before' used in this sentence is ________.

(1) preposition (2) conjunction (3) adverb (4) adjective

---

**55.** Identify incorrect sentence/s.

(a) Don't fail coming to the meeting.

(b) Have you decided to marry him ?

(c) We must avoid to smoke.

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) only

(3) (a) and (b) only (4) (a) and (c) only

---

**56.** I purchased ________ one-way ticket from Miraj to Mumbai.

The proper article to be used in the blank would be :

(1) a (2) an (3) the (4) none

---

**57.** Fill in the blank in the following sentence with an appropriate phrase.

At the meeting, the parents were ________.

(1) With full cry (2) Having full cry

(3) In full cry (4) About full cry

---

**58.** Choose an expression that explains the given word correctly.

Iconoclast

(1) One who is opposed to popular beliefs.

(2) One who is opposed to idol worship.

(3) One who is specially sent by God to preach a particular religion.

(4) One who is against all forms of government.

---

**59.** Choose the correct phrase out of the alternatives :

(1) At loggerheads with (2) On loggerheads with

(3) To loggerheads with (4) About loggerheads with

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**60.** Choose the correct word for the following.
A person who is womanish in his habits.
(1) Feminist (2) Effeminate (3) Philanderer (4) Philogynist

---

**61.** Choose the word which most closely fits the definition.
A person against whom legal action is instituted.
(1) Defendant (2) Litigant (3) Appellant (4) Deponent

---

**62.** Choose the correct synonym/s of the word printed in capitals in the following sentence.
The film vividly shows the STARK realities of life for the poor and hungry.
(a) Hard (b) Bare (c) Severe
**Answer options :**
(1) (a) only (2) (b) and (c) only
(3) (a) and (b) only (4) (a), (b) and (c)

---

**63.** He was ________ dressed for the party.
Choose the right antonym of the word 'immaculately' for filling the blank :
(1) imperfectly (2) irresponsibly (3) incompletely (4) moderately

---

**64.** You must pay for the mistakes you made in your life.
In this sentence must is........
(1) a principle auxiliary (2) a modal auxiliary
(3) the main verb (4) none of these

---

**65.** Which of the following sentence/s is/are **incorrect** ?
(a) I used to lived in Bombay.
(b) My wife is used for getting up early.
(c) We are used to the noise our neighbours make, though we don't like it.
**Answer options :**
(1) (a) only (2) (b) and (c) only
(3) (a), (b) and (c) (4) (a) and (b) only

---

**66.** Choose the correct antonymn of - <u>Absolve</u>.
(1) bless (2) repent (3) melt (4) blame

---

**67.** Select a word nearest to the meaning of <u>remorse</u> :
(1) revenge (2) repentance (3) pity (4) pride

---

**68.** The word 'fast' may be used as :
(1) Only Verb (2) Noun and Verb
(3) Noun, Verb and Adverb (4) Noun, Verb, Adverb and Adjective

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**69.** (a) He both won a lottery and a scholarship.
(b) He won both a lottery and a scholarship.
(c) He had no other habit but that of collecting stamps.
(d) He had no other habit than that of collecting stamps.
Which of the above sentences are grammatically **correct** ?
(1) Only (a) and (c) are correct (2) Only (a) and (d) are correct
(3) Only (b) and (d) are correct (4) Only (a), (b) and (c) are correct

**70.** Rearrange the following 1 to 6 parts to form a meaningful sentence.
1. He does not want
P. a communist but
Q. are likely to bring out the
R. to be branded
S. the steps he is taking
6. true nature of his politics
(1) SPRQ (2) RPSQ (3) QPSR (4) RSPQ

**71.** The population of the world ________ very fast.
Fill in the blank with an acceptable form of the verb given below :
(1) rises (2) has risen (3) is rising (4) has been risen

**72.** A person who eats too much.
Choose the right substitution to the phrase.
(1) glutton (2) reveller (3) sensudist (4) omnivore

**73.** Choose the correct alternative from the following to fill in the blank :
They agreed that the election ________ be held at any early date.
(1) should (2) would (3) shall (4) will

**74.** Which of the following words are mis-spelt ?
(a) LIEUTENANT
(b) COLONEL
(c) LIAISE
**Answer options :**
(1) (a) only (2) (b) only
(3) (c) only (4) None of the above

**75.** I <u>have a bone to pick</u> with you in this matter.
Choose the correct alternative given for the idiom/phrase underlined in the above sentence.
(1) an angry (2) selfish motive (3) selfless motive (4) desire

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**Instruction : Read the passage given below carefully and answer question numbers 76 to 80 based on it.**

People talk of memorials to him in statues of bronze or marble or pillars and thus they mock him and belie his message. What tribute shall we pay to him that he would have appreciated ? He has shown us the way to live and the way to die and if we have not understood that lesson it would be better that we raised no memorial to him, for only fit memorial is to follow reverently in the path he showed us and to do our duty in life and in death.

He was a Hindu and an Indian, the greatest in many generations, and he was proud of being a Hindu and an Indian. To him India was dear because she had represented throughout the ages certain immutable truths. But though he was intensely religious and came to be called the Father of the Nation which he had liberated, yet no narrow religious or national bonds confined his spirit. And so he became the great internationalist, believing in the essential unity of man, the underlying unity of all religions, and the needs of humanity, and more specially devoting himself to the service of the poor, the distressed and the oppressed millions everywhere.

His death brought more tributes than have been paid at the passing of any other human being in history. Perhaps what would have pleased him best was the spontaneous tributes that came from the people of Pakistan. On the morrow of the tragedy, all of us forgot for a while the bitterness that had crept in, the estrangement and conflict of these past months and Gandhiji stood out as the beloved champion and leader of the people of India, of India as it was before partition cut up this living nation.

What was his great power over the mind and heart of man due to ? Even we realize that his dominating passion was truth. That truth led him to proclaim without ceasing that good ends can never be attained by evil methods, that the end itself is distorted if the method pursued is bad. That truth led him to confess publicly whenever he thought he had made a mistake - Himalayan errors he called some of his own mistakes. That truth led him to fight evil and untruth wherever he found them regardless of the consequences. That truth made the service of the poor and the dispossessed the passion of his life, for where there is inequality and discrimination and suppression there is injustice and evil and untruth. And thus he became the beloved of all those who have suffered from social and political evils, and the great representative of humanity as it should be. Because of that truth in him wherever he sat became a temple and where he trod was hallowed ground.

---

76. What made the great man in the passage an internationalist ?

(a) Belief in himself

(b) Belief in the essential unity of man

(c) Belief in the underlying unity of all religions

**Answer options :**

(1) (a) only (2) (b) only

(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

77. What did Gandhiji think of methods of attaining ends ?
   (1) Good ends justify the methods used.
   (2) Good ends are a reward for hard work.
   (3) Good ends can never be attained by evil methods.
   (4) Ends and methods are two separate entities.

---

78. What would have pleased the great man best ?
   (1) Tributes from foreign countries
   (2) Tributes from the people of Pakistan
   (3) Statues of Bronze
   (4) Statues of marble

---

79. How did Gandhiji view some of his own mistakes ?
   (1) As grave errors (2) As Himalayan errors
   (3) As Himalayan tasks (4) As natural errors

---

80. The great man described in the passage was :
   (a) A Hindu
   (b) An Indian
   (c) An Internationalist

   **Answer options :**
   (1) (a) only (2) (b) only
   (3) (a) and (b) only (4) (a), (b) and (c)

---

81. न्यायमूर्ती रानड्यांचा आर्थिक राष्ट्रवाद पुढील कोणत्या गोष्टींत त्यांनी घेतलेल्या पुढाकारावरून दिसून येतो ?
   (a) वैज्ञानिक व औद्योगिक शिक्षणोत्तेजक मंडळी.
   (b) औद्योगिक प्रदर्शन.
   (c) औद्योगिक परिषद.
   (d) पश्चिम भारताची औद्योगिक मंडळी.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) (b), (c) आणि (d) (2) (a), (b) आणि (c)
   (3) (a), (b) आणि (d) (4) (a), (c) आणि (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**82.** बहिष्कृत हितकारिणी सभेतील उद्दिष्ट्ये खालील प्रमाणे मांडण्यात आली आहेत. या मधील अयोग्य असे उद्दीष्ट कोणते ?

(1) स्पृश्य लोकांनी अस्पृश्यांना त्यांचे नागरिकत्वाचे अधिकार बजाविण्याच्या कामात मदत करावी.

(2) स्पृश्य लोकांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे आणि अस्पृश्य विद्यार्थांना वार लावून जेवण द्यावे.

(3) समाजामध्ये उच्च संस्कृतीची वाढ करण्यासाठी वाचनालये, शैक्षणिक वर्ग व स्वाध्याय संघ स्थापन करावे.

(4) मृत जनावरे ज्याची त्यांनी ओढावी.

---

**83.** 1932 साली झालेल्या पुणे करारात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधीजी यांच्यात कोणत्या गोष्टींवर एकमत झाले ?

(a) दलितांना सरकारी नोकऱ्यांत आरक्षण

(b) दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघ

(c) दलितांसाठी प्रादेशिक विधिमंडळात 147 राखीव जागा

(d) केंद्रीय कायदेमंडळात दलितांसाठी 28% राखीव जागा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) (2) फक्त (c) (3) (c) आणि (d) (4) (a) आणि (d)

---

**84.** 'जय तु शिवाजी' या काव्याची रचना कोणी केली ?

(1) विनायक दामोदर सावरकर (2) रविन्द्रनाथ टागोर

(3) गोपाळ कृष्ण गोखले (4) गोपाळ गणेश आगरकर

---

**85.** जवाहरलाल नेहरूंबाबत पुढीलपैकी कोणते विधान **खरे** नाही ?

(1) 1946-47 मध्ये ते अखिल भारतीय संस्थानी प्रजा परिषदेचे अध्यक्ष होते.

(2) 1948 मध्ये सांप्रदायिक एकतेची शाश्वती देणाऱ्या केंद्रीय शांतता समितीचे ते अध्यक्ष होते.

(3) त्यांचे शिक्षण हॅरो व केंब्रिज मध्ये झाले.

(4) भारतीय राष्ट्रीय सभेच्या लाहोर अधिवेशनात त्यांची अध्यक्षपदी निवड झाली.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**86.** भारतीय राष्ट्रवाद्यांचा मिठावरील कराला विरोध का होता ?

(a) मिठासारख्या जीवनावश्यक वस्तूवर कर लावणे अयोग्य होते.

(b) गरीबात गरीब लोकांनाही हा कर भरावा लागे.

(c) यामुळे लोकांनी मिठाचे सेवन कमी केले असते व त्यांच्या आरोग्यावर परिणाम झाला असता.

(d) कायदेमंडळातील भारतीय सदस्यांनी त्याविरुद्ध मते मांडली होती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ (a) (2) केवळ (a) व (b)

(3) केवळ (a), (b) व (c) (4) (a), (b), (c), (d) सर्व

---

**87.** 1849 मध्ये पुढीलपैकी कोणत्या कंपन्यांबरोबर तत्कालीन भारत मंत्र्यांनी सर्वात पहिले रेल्वे करार केले ?

(a) ईस्ट इंडिया रेल्वे कंपनी

(b) बॉम्बे, बरोडा ॲन्ड सेन्ट्रल इंडिया रेल्वे कंपनी

(c) ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वे कंपनी

(d) निझाम्स् गॅरन्टीड स्टेट रेल्वे कंपनी

**पर्यायी उत्तरे :**

(1) वरील सर्व (2) (a) आणि (c)

(3) (b) आणि (d) (4) (a) आणि (b)

---

**88.** 73 व्या घटनादुरुस्तीमुळे खेड्यांमध्ये काय घडून आले ?

(a) पंचायतीकडे आर्थिक बाबींचा संपूर्ण अधिकार आला.

(b) पंचायतीतील जागांवर स्त्रियांना 1/3 आरक्षण मिळाले.

(c) पंचायतींचे अधिकार व कामे वाढली.

(d) अनुसूचित जाती व जमातींना पंचायतीतील जागांवर आरक्षण मिळाले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) आणि (c) (2) (b), (c) आणि (d)

(3) (a), (c) आणि (d) (4) (a), (b) आणि (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

89. मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ असे व्हावे या साठीच्या आंदोलनात पुढीलपैकी कोणते नेते सहभागी होते ?

(a) गंगाधर गाडे

(b) म.भि. चिटणीस

(c) हाजी मस्तान मिर्झा

(d) गोविंदभाई श्रॉफ

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) आणि (d) (2) (b), (c) आणि (d)

(3) (a), (c) आणि (d) (4) (a), (b) आणि (c)

---

90. 1879 च्या डेक्कन ॲग्रिकल्चरिस्ट्स् रिलीफ ॲक्ट मध्ये पुढीलपैकी कोणत्या तरतुदी होत्या ?

(a) न्यायालये शेतकऱ्याच्या कर्जावर योग्य व्याज ठरवू शकणार होती.

(b) कर्जदाराची जमीन विकली जाण्याची वेळ येणार नव्हती.

(c) कर्ज फेडले नाही म्हणून कर्जदाराला तुरुंगात टाकता येणार नव्हते.

(d) जमिनीवरील कराचा दर कमी केला होता.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b) आणि (c) (2) (b), (c) आणि (d)

(3) (a), (c) आणि (d) (4) (a), (b) आणि (d)

---

91. सर्वसाधारणपणे मृदेत ________% पाणी, ________% हवा, ________% खनिज द्रव्ये आणि ________% सेंद्रिय द्रव्ये असतात.

(1) 05, 25, 25 आणि 45 (2) 25, 25, 30 आणि 20

(3) 20, 30, 45 आणि 05 (4) 25, 25, 45 आणि 05

---

92. खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) अमरावती जिल्ह्याच्या ईशान्य भागात धारणी व चिखलदरा तालुके आहेत.

(2) जीवनगड डोंगरात मेळघाट हा दाट जंगलाचा विभाग आहे.

(3) जीवनगड डोंगराच्या उत्तरेकडे गाविलगड डोंगर आहेत.

(4) धूळे जिल्ह्याच्या शिरपूर तालुक्यातील बाबाकुवर डोंगराची उंची 503 मी. आहे.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**93.** खालील विधाने पहा :

(a) गोदावरी नदीचे खोरे उत्तरेकडे सातमाळा - अजिंठ्याचे डोंगर व दक्षिणेकडे हरिश्चंद्र बालाघाट डोंगर या मधे आहे.

(b) भिमा नदीचे खोरे उत्तरेस हरिश्चंद्र बालाघाट डोंगर व दक्षिणेस शंभू महादेवाचे डोंगर या मधे आहे.

(c) सातपुडा पर्वत रांगेत अस्तंभा डोंगर आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (a) आणि विधान (b) चूक
(2) विधान (a) आणि विधान (c) चूक
(3) विधान (a), (b) आणि विधान (c) चूक
(4) विधान (a), (b) आणि विधान (c) बरोबर

---

**94.** खालील विधाने पहा :

(a) महाराष्ट्रामध्ये लघु पाटबंधारे योजनांतर्गत पूर्ण प्रकल्प झालेल्यापैकी सर्वात जास्त जलसिंचनाचे क्षेत्र धुळे-नंदुरबार जिल्ह्यात असून, त्या खालोखाल चंद्रपूर, सोलापूर, सांगली व पुणे जिल्ह्याचा क्रमांक आहे.

(b) महाराष्ट्रातील प्रशासकिय विभागांमधिल जलाशयांची संख्या ही पुणे विभागामध्ये सर्वात जास्त असून त्या खालोखाल औरंगाबाद विभागाचा क्रमांक लागतो. तसेच, कोकण विभागामध्ये जलाशयांची संख्या सर्वात कमी आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) बरोबर
(2) (a) बरोबर (b) चूक
(3) (a) चूक (b) बरोबर
(4) (a) आणि (b) चूक

---

**95.** जागतिक हवामानासंदर्भातील खालील विधाने पहा :

(a) न्यूझीलँडमधे स्थानिक वाऱ्यांना नॉर्वेस्टर म्हणतात.

(b) फॉन हे रॉकी पर्वतातील वाऱ्याचे नाव आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) विधान (a) बरोबर आणि विधान (b) चूक आहे.
(2) विधान (a) चूक आणि विधान (b) बरोबर आहे.
(3) विधान (a) आणि विधान (b) चूक आहेत.
(4) विधान (a) आणि विधान (b) बरोबर आहेत.

---

**96.** खालील विधाने पहा :

(a) भारताच्या एकूण ठिबक जलसिंचन क्षेत्रातील महाराष्ट्राचा वाटा 60% असून महाराष्ट्रात द्राक्षे व केळीचे 50% क्षेत्र ठिबक जलसिंचन क्षेत्राखाली आहे.

(b) महाराष्ट्राचा भारतात सोयाबीन आणि ऊस उत्पादनात दुसरा क्रमांक आहे. सोयाबीनचा दर हेक्टरी उत्पादनात प्रथम, तर ऊसाचा क्रमांक दुसरा आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (b) बरोबर
(2) (a) बरोबर (b) चूक
(3) (a) चूक (b) बरोबर
(4) (a) आणि (b) चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**97.** महाराष्ट्रातील शेती संदर्भातील विधानांचा अभ्यास करा.

(a) महाराष्ट्रात सर्वात जास्त पिकाखालील एकूण क्षेत्र अहमदनगर जिल्ह्यात तर सर्वात कमी क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे.

(b) महाराष्ट्रात रब्बी पिकांचे सर्वात जास्त क्षेत्र सोलापूर जिल्ह्यात आहे तर सर्वात कमी क्षेत्र रत्नागिरी जिल्ह्यात आहे.

**पर्यायी उत्तरे** :

(1) विधान (a) बरोबर आणि विधान (b) चूक आहे.

(2) विधान (a) चूक आणि विधान (b) बरोबर आहे.

(3) विधान (b) आणि विधान (a) चूक आहेत.

(4) विधान (a) आणि विधान (b) बरोबर आहेत

---

**98.** खालील विधाने पहा :

(a) महाराष्ट्रात पहिली सुत गिरणी इ.स. 1851 मध्ये कावसजी टाटा यांनी मुंबईत सुरु केली.

(b) महाराष्ट्रात पहिला सहकारी साखर कारखाना 1955 साली पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाला.

**पर्यायी उत्तरे** :

(1) दोन्ही विधाने बरोबर (2) दोन्ही विधाने चूक

(3) (a) बरोबर तर (b) चूक (4) (b) बरोबर तर (a) चूक

---

**99.** खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

(1) महाबळेश्वर, पाचगणी येथे जांभा दगड आढळतो.

(2) जांभा दगड बेसाल्टच्या कायीक विदारणातून तयार झालेला आहे.

(3) महाराष्ट्राच्या 80 टक्के भूप्रदेशावर क्रिटॅशिअम कालखंडातील लाव्हा रसाचे थर आहेत.

(4) जांभा खडकात जास्तीत जास्त ॲल्युमिनियम आढळते.

---

**100.** खालील विधाने पहा :

(a) सुर्यावरील डागांचे चक्र 11 वर्षाचे असते.

(b) सुर्याकडून येणाऱ्या सौरशक्तीपैकी 23 टक्के सौरशक्ती ढगाकडून अवकाशाकडे परावर्तीत होते.

**पर्यायी उत्तरे** :

(1) विधान (a) बरोबर आणि विधान (b) चूक आहे.

(2) विधान (b) बरोबर आणि विधान (a) चूक आहे.

(3) विधान (a) आणि विधान (b) बरोबर आहेत.

(4) विधान (b) आणि विधान (a) चूक आहेत.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

101. खालील विधाने विचारात घ्या :

(a) महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या पंचायत राज व्यवस्थेसंबंधीच्या तरतुदी 1958 सालचा मुंबई (महाराष्ट्र) राज्य ग्रामपंचायत कायदा व 1961 सालचा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती कायद्यांन्वये करण्यात आल्या आहेत.

(b) जिल्हा परिषदेच्या कार्यकाळास मुदतवाढ देण्याचा अधिकार राज्य सरकारांना आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (b) (4) यापैकी नाही

---

102. संविधान समितीच्या उद्घाटनाच्या बैठकीचे अध्यक्षस्थान पुढीलपैकी कोणी भूषविले होते ?

(1) सच्चिदानंद सिन्हा (2) पी. उपेंद्र (3) बी.आर. आंबेडकर (4) डॉ. राजेंद्र प्रसाद

---

103. जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचा कार्यकाळ किती वर्षांचा असतो ?

(1) पाच वर्षे (2) एक वर्षे (3) अडीच वर्षे (4) तीन वर्षे

---

104. खालील सूची "अ" आणि सूची "ब" मधील जोड्या जुळवा :

| सूची "अ" (मूलभूत हक्क) | सूची "ब" (कलमे) |
|---|---|
| (a) समतेचा हक्क | (i) कलम 25 ते 28 |
| (b) धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क | (ii) कलम 14 ते 18 |
| (c) शोषणाविरुद्धचा हक्क | (iii) कलम 23 ते 24 |
| (d) सांविधानिक उपाययोजनेचा हक्क | (iv) कलम 32 ते 35 |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (i) | (iii) | (ii) | (iv) |
| (3) | (ii) | (i) | (iii) | (iv) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

---

105. खालील विधाने विचारात घ्या :

(a) मूलभूत कर्तव्ये हा भारतीय राज्यघटनेचा मूळ गाभा आहे.

(b) 2002 सालच्या 86 व्या घटनादुरुस्तीने 11 वे कर्तव्य घटनेत समाविष्ट करण्यात आले.

(c) मूलभूत कर्तव्ये भारतीय राज्यघटनेच्या भाग 4 'अ' मध्ये (कलम 51 'अ') मध्ये समाविष्ट आहेत.

वरीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (c) (3) (a) आणि (c) (4) (a), (b) आणि (c)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**106.** खालील विधाने विचारात घ्या :

(a) विधान परिषद अस्तित्वात येण्यासाठी कमीत कमी 40 व जास्तीत जास्त संबंधित राज्याच्या विधान सभेच्या एकूण सदस्य संख्येच्या 1/3 इतके सदस्य असावे लागतात.

(b) विधान परिषद स्थायी सभागृह आहे.

(c) विधान परिषदेच्या सभासदाचा कार्यकाल सहा वर्षे इतका आहे.

वरीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(1) (a) आणि (b) (2) (b) आणि (c) (3) (a) आणि (c) (4) (a), (b) आणि (c)

---

**107.** कार्यकारी मंडळ आणि न्यायालय यांच्यातील विभाजन पुढीलपैकी कशामुळे झाले आहे ?

(1) भारतीय संविधानाची सातवी यादी (2) न्यायिक निर्णय

(3) उद्देशिका (4) मार्गदर्शक तत्वे

---

**108.** भारतीय राज्यघटनेच्या कोणत्या कलमानुसार कायदेमंडळाला घटनादुरुस्तीचा अधिकार प्राप्त झाला आहे ?

(1) कलम 356 (2) कलम 366 (3) कलम 367 (4) कलम 368

---

**109.** भारतातील केंद्र-राज्य संबंधा संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(a) भारतीय राज्यघटनेच्या कलम 246 नुसार केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये अधिकारांचे वाटप तीन प्रकारे करण्यात आले आहे.

(b) मूळ संविधानात केंद्र सूचीत 97 विषय होते आता त्यांची संख्या 99 आहे.

(c) भारतीय राज्यघटनेच्या कलम 248 नुसार शेषाधिकार राज्यांकडे सुपूर्द करण्यात आले आहेत.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) फक्त (2) (b) फक्त (3) (a) आणि (b) (4) (a), (b) आणि (c)

---

**110.** 2010 पर्यंत भारतात एकूण सहा राज्यांतच विधानपरिषद अस्तित्वात होती. त्यानंतर कोणत्या राज्यात विधान परिषदेची निर्मिती करण्यात आली ?

(1) राजस्थान (2) गुजरात (3) हिमाचल प्रदेश (4) तामिळनाडू

---

**111.** राज्यांच्या राज्यपालांच्या विशिष्ट स्वविवेकाधिन अधिकारासंदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(a) महाराष्ट्राच्या राज्यपालांस स्वत:ला विदर्भ व मराठवाड्यासाठी 'स्वतंत्र विकास मंडळांची' स्थापना करता येते.

(b) अरुणाचल प्रदेशच्या राज्यपालांना राज्यात कायदा व सुव्यवस्थेची हमी देण्यासंबंधी विशेष जबाबदारी सोपवली आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (b) (4) यापैकी नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**112.** न्यायिक पुनर्विलोकनाची संकल्पना पुढीलपैकी कोणत्या देशाच्या संविधानापासून प्रेरित आहे ?

(1) ब्रिटन (2) स्वित्झर्लंड (3) अमेरिका (4) सोव्हिएत रशिया

---

**113.** भारतीय संविधानातील समवर्ती सूची मध्ये पुढीलपैकी कशाचा समावेश आहे ?

(1) लोकसंख्या नियंत्रण आणि कुटुंबनियोजन

(2) सार्वजनिक आरोग्य आणि मलनिसा:रण

(3) कंपनी कर

(4) अबकारी शुल्क

---

**114.** 'एखाद्या व्यक्तीला शरीराने हजर करा' असा आदेश न्यायालयाला घटनात्मक उपायांच्या अधिकारातील कशाद्वारे करता येतो ?

(1) परमादेश (2) बंदीप्रत्यक्षीकरण (3) उत्प्रेक्षण (4) यापैकी नाही.

---

**115.** भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यामध्ये भारताचे वर्णन अनेक विशेषणे वापरून केले आहे.
त्या सर्व विशेषणांचा उल्लेख खालील पर्यायांमध्ये केला आहे. कोणत्या पर्यायामध्ये शब्दांचा क्रम अचुक आहे ते सांगा.

(1) सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, गणराज्य, लोकशाही

(2) समाजवादी, धर्मनिरपेक्ष, गणराज्य, लोकशाही, सार्वभौम

(3) धर्मनिरपेक्ष, गणराज्य, लोकशाही, सार्वभौम, समाजवादी

(4) सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य

---

**116.** पुढीलपैकी कोणत्या पंचवार्षिक योजनेने 'मानवी विकासाला' विकासाच्या प्रयत्नांमध्ये प्रमुख स्थान दिले ?

(1) आठवी पंचवार्षिक योजना (2) सातवी पंचवार्षिक योजना

(3) पाचवी पंचवार्षिक योजना (4) तिसरी पंचवार्षिक योजना

---

**117.** खालील विधाने विचारात घ्या :

(a) महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी कायदा (मनरेगा) 2005 मध्ये अस्तित्वात आला.

(b) या कायद्यानुसार ग्रामीण अकुशल कामगारांना वर्षातून किमान शंभर दिवस कामाची हमी देण्यात आली आहे.

(c) मनरेगाअंतर्गत लाभार्थींना दिले जाणारे वेतन टपाल खात्यामार्फत बचत खात्यांमध्ये जमा केले जाते.

(d) देशातील 100 जिल्ह्यांमध्ये ही योजना अस्तित्वात आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) (a) आणि (b) (2) (a), (b) आणि (c)

(3) फक्त (a) (4) फक्त (d)

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**118.** महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम विषयक विधाने लक्षात घ्या व **अचूक** उत्तर द्या ?

(a) महाराष्ट्रातील अतिमागास जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक उंचविण्यासाठी हा कार्यक्रम सुरु करण्यात आला.

(b) महाराष्ट्र शासनाने जून 2005 मध्ये महाराष्ट्र मानव विकास मिशनची स्थापना केली.

(c) महाराष्ट्र मानव विकास अहवालानुसार महाराष्ट्रातील 12 अतिमागास जिल्ह्यांसाठी ह्या कार्यक्रमाचा प्रारंभ केला.

(d) या अंतर्गत मानव विकासासाठी तालुका हा घटक मानण्यात आला.

(e) या अंतर्गत मानव विकासासाठी जिल्हा हा घटक निर्धारित करण्यात आला.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c), (e) अचुक तर (d) चूक
(2) (a), (c), (e) अचुक तर (b), (d) चूक
(3) (a), (c), (d) अचुक तर (b), (e) चूक
(4) वरील सर्व अचुक

---

**119.** केंद्रीय नियोजन आयोगाने 12 वी पंचवार्षिक योजना (2012-2017) तीन खंडात प्रकाशित केली, या तीन खंडांची शीर्षके खालीलप्रमाणे आहेत.

| | **खंड - 1** | **खंड - 2** | **खंड - 3** |
|---|---|---|---|
| (1) | आर्थिक क्षेत्रे | सामाजिक क्षेत्रे | जलद, अधिक समावेशक व शाश्वत वृद्धी (विकास) |
| (2) | सामाजिक क्षेत्रे | आर्थिक क्षेत्रे | जलद, अधिक समावेशक व शाश्वत वृद्धी (विकास) |
| (3) | जलद, अधिक समावेशक व शाश्वत वृद्धी विकास | आर्थिक क्षेत्रे | सामाजिक क्षेत्रे |
| (4) | जलद, अधिक समावेशक व शाश्वत वृद्धी (विकास) | सामाजिक क्षेत्रे | आर्थिक क्षेत्रे |

---

**120.** 2012-13 च्या महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवालानुसार राज्यातील औद्योगिक व सेवा दोन्ही क्षेत्रांचा राज्य उत्पन्नात एकत्रित हिस्सा तसेच कृषी व संलग्न कार्ये या क्षेत्राचा अनुक्रमे राज्य उत्पन्नातील हिस्सा आहे.

(1) 66.1%, 33.9% (2) 77.1%, 22.9% (3) 87.1%, 12.9% (4) 55.1%, 44.9%

---

**121.** संयुक्त राष्ट्र लोकसंख्या निधी अहवालानुसार तरुणांची संख्या सर्वात जास्त असलेला देश कोणता आहे ?

(1) भारत (2) चीन (3) अमेरिका (4) इंडोनेशिया

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**122.** 2014 साली इंदिरा गांधी शांतता, नि:शस्त्रीकरण आणि विकासासाठीचा पुरस्कार कोणाला मिळाला ?

(1) इस्रो (ISRO) (2) सुझलॉन (Suzlon)

(3) कोल इंडिया (Coal India) (4) ओ.एन.जी.सी (ONGC)

---

**123.** खालील विधाने विचारात घ्या -

(a) केंद्र सरकारने 5 जुलै 2013 रोजी राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा संमत केला.

(b) या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील 75% ग्रामीण व 50% शहरी भागातील नागरिकांना अनुदानीत दराने धान्य उपलब्ध होणार आहे.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (b) (4) यापैकी नाही

---

**124.** कामतापूर लिबरेशन ऑर्गनायझेशन (KLO) ही नुकतीच बंदी घातलेली संघटना पुढीलपैकी कोणत्या राज्यात कार्यरत होती ?

(1) पश्चिम बंगाल आणि आसाम (2) आसाम आणि नागालँड

(3) नागालँड आणि मणिपूर (4) पश्चिम बंगाल आणि ओढिशा

---

**125.** सरल रोजगार कार्डामार्फत मोबाईलद्वारे रोजगार उपलब्ध करून देण्याची योजना कोणत्या उद्योग संस्थेने सादर केली आहे ?

(1) टेक महिंद्रा (2) टीसीएस (3) इन्फोसिस (4) सत्यममहिंद्रा

---

**126.** 61 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यामध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार कोणत्या चित्रपटास मिळाला ?

(1) शिप ऑफ थीसीयस (2) भाग मिल्खा भाग

(3) शहीद (4) फँड्री

---

**127.** तृतीयपंथीयांना अधिकृत मान्यता मिळवून देणाऱ्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर देशात सर्वप्रथम कुठल्या महाविद्यालयाने आपल्या प्रवेश अर्जात तृतीय पंथीयांसाठी प्रवर्ग निर्माण केला आहे ?

(1) फर्ग्यूसन महाविद्यालय, पुणे (2) रूईया महाविद्यालय, मुंबई

(3) टाटा समाजविज्ञान संस्था, मुंबई (4) स.प. महाविद्यालय, पुणे

---

**128.** फिलीप ह्युजेस ह्या ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूचे कुठल्या गोलंदाजाचा चेंडू डोक्यावर आदळल्यामुळे निधन झाले ?

(1) डेलास्टेन (2) मकाया एन्टोनी (3) सीन ॲबॉट (4) ब्रेट ली

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**129.** कोणत्या भारतीय व्यक्तिमत्वास ब्रिटीश सरकारचा 2014 सालचा नाईट ग्रँड क्रॉस (Knight Grand Cross) हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्राप्त झाला आहे ?

(1) रतन टाटा (2) नारायण मूर्ती (3) नंदन निलेकणी (4) मुकेश अंबानी

---

**130.** 2014 सालात भारतातील कोणत्या शहरात सगळ्यात अधिक इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या आढळून आली ?

(1) नवी दिल्ली (2) कोलकाता (3) मुंबई (4) बंगळूरु

---

**131.** खालील विधाने विचारात घ्या :

(a) संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे 21 जून हा दिवस ''आंतरराष्ट्रीय योग दिन'' म्हणून साजरा केला जाणार आहे.

(b) आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्याबाबत भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी सूचना केली होती.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (b) (4) यापैकी नाही

---

**132.** पंजाबमधील घुमान येथे होणाऱ्या 88 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे हे कुठल्या विषयाचे (निवृत्त) प्राध्यापक आहेत ?

(1) मराठी (2) संस्कृत (3) तत्त्वज्ञान (4) राज्यशास्त्र

---

**133.** अनिता कपूर हे नांव बातम्यामध्ये चर्चेत होते. त्या खालीलपैकी कोणत्या क्षेत्राशी संबंधित आहेत ?

(1) त्यांची राष्ट्रीय रासायनिक शस्त्रास्त्र संधी प्राधिकरण अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

(2) त्यांची केंद्रीय चित्रपट सेन्सार बोर्डच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

(3) त्यांची युरोपियन अणुसंशोधन संस्थेवर भारतातर्फे सदस्य म्हणून निवड करण्यात आली.

(4) त्यांची केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

---

**134.** केंद्र सरकारच्या स्वावलंबन योजनेचे उद्दिष्ट आहे :

(1) असंघटीत क्षेत्रासाठी निवृत्ती वेतन योजना

(2) ग्रामीण भागातील तरुणांसाठी 100 दिवसांसाठी रोजगार

(3) निमशहरी गरीबांसाठी बॅंकिंग सुविधा

(4) निमशहरी गरीबांसाठी आरोग्य सुविधा

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**135.** पृथ्वीवरील सर्वात जुने पाणी ओंटारिओ येथील टिमिन्स खाणीत सापडले असून ते 1.5 अब्ज वर्षापूर्वीचे आहे. ही खाण कोणत्या देशामध्ये आहे ?

(1) मेक्सिको (2) ऑस्ट्रेलिया (3) दक्षिण आफ्रिका (4) कॅनडा

---

**136.** दरवर्षी 19 नोव्हेंबरला पुढीलपैकी कोणता दिवस साजरा केला जातो ?

(1) जागतिक हरित दिवस (2) जागतिक गरीबी-विरोधी दिन

(3) जागतिक शौचालय दिन (4) जागतिक स्वच्छ जल दिन

---

**137.** मलाला युसूफझई यांच्या संदर्भात खालील विधाने विचारात घ्या :

(a) त्या पाकिस्तानातील स्त्री शिक्षण चळवळीतील कार्यकर्त्या आहेत.

(b) त्यांना 2014 चा नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला.

(c) नोबेल पुरस्कार प्राप्त करणाऱ्या त्या दुसऱ्या पाकिस्तानी नागरिक आहेत.

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (b) (4) (a), (b) आणि (c)

---

**138.** युरोपियन संघातील कुठल्या राष्ट्राने पॅलेस्टाईनला राष्ट्र म्हणून नुकतीच अधिकृत मान्यता दिली आहे ?

(1) ग्रीस (2) स्वीडन (3) बेल्जिअम (4) लकझेंबर्ग

---

**139.** खालील विधाने विचारात घ्या :

(a) भारत हा जगातील सर्वात मोठा शस्त्रास्त्रे आयात करणारा देश आहे.
(2008-2012 या कालावधीसाठीच्या आकडेवारीवर आधारित)

(b) अमेरिका व चीन हे देश शस्त्रास्त्रे निर्यात करणाऱ्यांमध्ये अनुक्रमे पहिल्या व पाचव्या क्रमांकाचे देश आहेत.
(2008-2012 या कालावधीसाठीच्या आकडेवारीवर आधारित)

वरीलपैकी कोणते/ती विधान/ने **बरोबर** आहे/त ?

(1) फक्त (a) (2) फक्त (b) (3) (a) आणि (b) (4) यापैकी नाही.

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

140. कैलाश सत्यर्थी यांच्याबाबतीत खालीलपैकी कोणते विधान खरे **नाही** ?

(a) ते बाल कामगार विरोधी चळवळीतील कार्यकर्ते आहेत.

(b) 1980 मध्ये त्यांनी "बचपन बचाओ आंदोलन" सुरु केले.

(c) ते युनोमध्ये भारताचे राजदूत म्हणून कार्यरत होते.


(d) त्यांना 2014 चा नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे.

**पर्यायी उत्तरे :**


(1) फक्त (a) आणि (d) (2) फक्त (c) (3) (a) आणि (b) (4) (b) आणि (c)

---

141. पुढील प्रतिभामालिकेतील तिसऱ्या जागेसाठी तर्कसंगत पर्याय निवडा –



(1) (2) (3) (4)



---

142. पुढील संख्यामालिकेतील प्रश्नचिन्हांच्या ठिकाणी ठेवण्यासाठी उचित संख्या जोडी निवडा :

$\frac{-4}{7}, \frac{6}{7}, \frac{-2}{7}, \frac{4}{7}, 0, ?, ?, 0$

पर्याय :

(1) $\frac{2}{7}, \frac{2}{7}$ (2) $\frac{-2}{7}, \frac{4}{7}$ (3) $\frac{4}{7}, \frac{-2}{7}$ (4) $\frac{2}{7}, 0$

---

143. राक्षसाचा वध करण्यासाठी निघालेल्या धनुर्धाऱ्याने स्वतःच्या धनुष्यावर एका वर्गसंख्येतक्या बाणांची स्थापना केली. यातील निम्म्या बाणांनी राक्षसाचे पायदळ नष्ट केले. सर्व बाणसंख्येच्या वर्गमूळाच्या चौपट बाणांनी राक्षसाचे सामान्य रक्षक ठार मारले. प्रमुख रक्षकांना मारण्यासाठी सहा बाण कामी आले. राक्षसाच्या वाहनाचा, ध्वजाचा व शस्त्राचा नाश प्रत्येकी एकेका बाणाने केला. अखेरीस उरलेला एक बाण मारून त्याने राक्षसाचे शीर उडविले. तर धनुर्धाऱ्याने किती बाण धनुष्यावर स्थापण केले होते ?

(1) 121 (2) 64 (3) 256 (4) 100

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**144.** आदर्शचे मनगटी घड्याळ व भिंतीवरील घड्याळ हे समान वेळा दर्शवितात. भिंतीवरील घड्याळात 10 वाजून 5 $x$ मिनिटे झाली होती, तर त्याच्या हातातील घड्याळ्यात 11 वाजायला $x$ मिनिटे बाकी होती. ती दोन्ही घड्याळे कोणती वेळ दर्शवितात ?

(1) 10 वाजून 10 मिनिटे (2) 11 वाजून 50 मिनिटे
(3) 10 वाजून 50 मिनिटे (4) 11 वाजून 10 मिनिटे

---

**145.** 80 या संख्येचे असे भाग पाडा की, पहिल्यामध्ये 3 मिळविले, दुसऱ्या भागातून 3 वजा केले, तिसऱ्याला 3 ने गुणले व चौथ्याला 3 ने भागले तर उत्तर समान येते. तर सर्वात लहान व सर्वात मोठा भाग कोणता ?

(1) 5, 45 (2) 7, 56 (3) 6, 36 (4) 4, 55

---

**146.** एका सांकेतिक भाषेत SUN = 624, PUL = 990, TOY = 168 तर FLY चा संकेत काय ?

(1) 768 (2) 874 (3) 169 (4) 630


---

**147.** एका जहाजावर 10 व्यक्ती बसलेल्या आहेत. एका 58 किलोग्राम वजन असणाऱ्या व्यक्तीच्या जागी अन्य व्यक्ती तेथे बसल्यावर समूहाच्या सरासरी वजनात 1.2 किलोग्राम वाढ झाली तर नवीन आलेल्या व्यक्तीचे वजन किती ?

(1) 59.2 किलोग्राम (2) 68 किलोग्राम (3) 70 किलोग्राम (4) 72 किलोग्राम

---

**148.** पुढील रचनेतील प्रश्नचिन्हांच्या जागी ठेवण्यासाठी उचित पर्याय निवडा -




(1) E, I (2) G, F (3) J, B (4) I, D

---

**149.** $4\frac{1}{2} + 3\frac{1}{6} + ? + 2\frac{1}{3} = 13\frac{2}{5}$

प्रश्नचिन्हांच्या जागी संख्या निवडा-

(1) $3\frac{2}{5}$ (2) 1 (3) $3\frac{1}{5}$ (4) $5\frac{2}{3}$

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial


**150.** सोडवा :


$$\frac{641 \times 641 \times 641 + 359 \times 359 \times 359}{641 \times 641 - 641 \times 359 + 359 \times 359}$$

(1) 641 (2) 359 (3) 282 (4) 1000

---

**151.** दिलेल्या घनाकारांपैकी सोबतच्या चौरससंचाची घडी घालून मिळू न शकणारे दोन घनाकार दर्शविणारा पर्याय निवडा :






(a) (b) (c) (d) (e)

(1) (b) आणि (c) (2) (a) आणि (c) (3) (c) आणि (e) (4) (c) आणि (d)

---

**152.** सोबतच्या आकृतीत प्रश्नचिन्हाच्या जागी येणारा पर्याय निवडा :




(1) 5 (2) 9 (3) 11 (4) 13

---

**153.** एका बागायतदाराची डाळिंबाची चार झाडे असून ती P, Q, R आणि S या वर्णाक्षरांनी उल्लेखिली जातात. Q ची फळे सर्वाधिक गोड असली तरी त्याच्या बिया सर्वात अधिक कडक नाहीत. S च्या फळांच्या बियांपेक्षा Q च्या फळांच्या बिया कडक असल्या तरी त्या P च्या फळांच्या बियांपेक्षा मऊ आहेत. R च्या फळांची गोडी S च्या फळांपेक्षा कमी असली तरीही P च्या फळांच्या गोडीपेक्षा कमी नाही. R च्या फळांच्या बिया सर्वात जास्त मऊ असल्या तरी त्याची गोडी सर्वात कमी नाही. या माहितीच्या आधारे अनुक्रमे गोडीचा व बियांच्या मऊपणाचा चढता क्रम दाखवणारा पर्याय निवडा.

(1) P, R, S, Q आणि S, P, Q, R (2) P, R, S, Q आणि R, P, Q, S


(3) P, R, S, Q आणि R, S, Q, P (4) P, R, Q, S आणि S, Q, P, R

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial


**154.** सोबतच्या आकृतीत A, B, C, D हे चार चौरस आहेत. आकृतीचे निरीक्षण करुन चौरस B ची परिमिती किती ?




(1) 48 cm (2) 12 cm (3) 32 cm (4) 10 cm

---

**155.** पुढील आकृतीवरुन सहाव्या रचनेत किती △ येतील ?



**रचना 1** **रचना 2** **रचना 3**

(1) 50 (2) 26 (3) 34 (4) 37

---

**156.** संक्षिप्त रूप निवडा –

$1 \div [1 + 1 \div \{1 + 1 \div (1 + 1 \div 2)\}]$

(1) $^{8}/_{5}$ (2) $^{5}/_{8}$ (3) 1 (4) 2

---

**157.** एक कामगार एका कंपनीत 31 जानेवारी 2012 पासून 1 मार्च 2013 पर्यंत कामावर उपस्थित होता. तर तो कामगार एकूण किती दिवस कामावर उपस्थित होता ?

(1) 395 दिवस (2) 396 दिवस (3) 397 दिवस (4) 426 दिवस

---

**158.** मालिकेच्या पाचव्या स्थानासाठी संख्या निवडा :

22 , 23 , 25 , 27 , __?__

(1) 29 (2) 31 (3) 30 (4) 32


---





**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**P.T.O.**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**159.** रिकाम्या जागेसाठी पर्याय निवडा -



(1)  (2)  (3)  (4) 

---

**160.** रचनाशोध घेऊन प्रश्नचिन्हासाठी पर्याय निवडा -

$5 - 4 = 23$

$8 - 1 = 63$

$6 - 16 = 32$

$9 - 9 = 78$


$3 - 9 = 6$

$3 - 81 = ?$

(1) 0 (2) 1 (3) 2 (4) 3

---

**161.** सोबतच्या आकृतीत अक्षरांची मांडणी एका विशिष्ट पद्धतीने केलेली आहे. काही अक्षरांऐवजी चिन्हे मांडली आहेत. अक्षरांच्या मांडणीतील सूत्र ओळखून △ च्या जागी कोणते अक्षर येईल ते लिहा.




(1) M (2) V (3) W (4) C

---

**162.** जेव्हा मकरंद नऊ वर्षाचा होता त्याने त्याच्या उंचीच्या अंतरावर एक खिळा जिवंत झाडाच्या खोडावर ठोकला. दहा वर्षानंतर मकरंद तो खिळा किती उंच गेला हे बघण्याकरिता आला. जर वर्षाकाठी झाड 8 सेमी. वाढत असेल तर मकरंदने ठोकलेला खिळा किती उंचीवर असेल ?

(1) 8 सेमी (2) 40 सेमी (3) 80 सेमी (4) मूळ उंचीवर

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**163.** पुढील परिच्छेद काळजीपूर्वक वाचा –

अनेक उत्सवांत व प्रसंगात आनंद व्यक्त करण्यासाठी मोठा आवाज करणारे फटाके वाजवणे, प्रकाशरंगांचा खेळ करणारे फटाके जाळणे, ध्वनिवर्धकांचा वापर करून संगीत वाजवणे इत्यादी गोष्टींची मजा लुटणे ही आमची परंपरा आहे. याची मजा लुटतांना लहान मुले, तरुण मंडळी व वृद्ध अशा सर्वच व्यक्ती उत्साही झालेल्या असतात. अनेक लोक ध्वनीप्रदूषणाच्या, हवा प्रदूषणांच्या कारणांचा हवाला देत आमच्या पूर्वापार जपलेल्या परंपरांना मोडीत काढू पाहतात. पण आमच्या मुलांबाळांपर्यंत ही परंपरा पोहोचवण्यासाठी आमचा अभिमान असलेली ही परंपरा जपण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

हा परिच्छेद पुढीलपैकी कोणत्या विधानाची उत्तम पाठराखण करतो ?

(1) आनंदाला साथ देण्यासाठी आवाजांची, प्रकाशरंगांची साथ ही हवीच.

(2) मुलाबाळांना प्रकाशाचे व आवाजांचे आकर्षण असतेच त्यामुळे त्यांचा आनंद हिरावून घेणे अयोग्य आहे.

(3) आमच्या परंपरांचा आम्हाला अभिमान असल्यामुळे ह्यावर कायद्याने बंदी आणण्याचा विचार करणाऱ्यांना आम्ही विरोध करणारच.

(4) प्रदूषणांचा बागुलबोवा उभा करून परंपरा मोडीत काढणे हे धर्मविरोधी आहे.

---

**164.** खालील पदावलीचे निरीक्षण करा. या पदावलीत याच क्रमाने एकूण 29 पदे आहेत तर या पदावलीची किंमत किती ?

12 – 10 + 14 – 15 + 12 – 10 + 14 – 15 + 12 – 10 + .......... = ?

(1) 08 (2) 19 (3) 144 (4) 7

---

**165.** सोबतच्या गुणाकाराच्या उदाहरणात □ , △, ■ व ▲ ही चिन्हे विशिष्ट अंकासाठी योजली असून ▲ = 6. या माहितीच्या आधारे पुढील प्रश्न सोडवा.

```
      □ □ □
    × △ △ △
    ---------
      □ □ □
    □ □ □ ■
  □ □ □ ■ ■
  ---------
  ▲ △ ▲ ■ □
  ---------
```

यावरुन □ × △ + ■ = किती ?

(1) △ (2) □ (3) ■ (4) वरीलपैकी नाही

---

**166.** लेखाकर्माची सुरवात म्हणजेच ________ चा शेवट होय.

(1) तेरीज पत्रक (2) ताळेबंद (3) पुस्तक पालन (4) खाते वही

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

167. रोजकिर्द संदर्भात खालीलपैकी कोणते विधान गैर लागू आहे ?

(1) व्यवहाराची मुळ नोंद रोजकिर्दीमध्ये करण्यात येते.

(2) रोजकिर्दीतून अचुक व्यवहार शोधून काढणे सोपे जाते.

(3) रोजकिर्दीमुळे सर्व व्यवहार एकत्रित उपलब्ध होतात.

(4) रोजकिर्दीतील व्यवहार ज्या क्रमाने होतात त्याच क्रमाने तारीखवार लिहिलेले असतात.

---

168. खालील माहितीच्या आधारे बँक पासबुकानुसार अधिकोष अधिविकर्ष कर्जाची रक्कम किती ते सांगा 31 डिसेंबर 2014 रोजीच्या रोकड किर्दीनुसार ₹ 16,000 इतकी अधिकोष अधिविकर्ष कर्ज रक्कम होती. ₹ 6,270 च्या निर्गमित धनादेशांचे डिसेंबर 2014 अखेर शोधन झालेले नाही. ₹ 5,120 चे राशी संग्रहणाचे धनादेश वसुल झालेले नाहीत. फक्त बँक पासबुकात ए.टी.एम्. सेवा व इतर सेवा शुल्काबाबत ₹ 80 ची आकारणी नोंदविलेली आहे. या माहितीच्या आधारे बँक पासबुकावरील अधिकोष अधिविकर्ष कर्जाची रक्कम किती सांगा ?

(1) ₹ 14,930 (2) ₹ 18,430 (3) ₹ 27,670 (4) ₹ 14,570

---

169. व्यापार खात्यामध्ये वर्ष अखेरीच्या शिल्लक मालाचा समावेश करताना त्याच्या किंमतीबद्दलचे खालीलपैकी **अयोग्य** विधान कोणते ?

(1) मालावरील नफा त्याची प्रत्यक्ष विक्री करण्यात आल्यावरच मिळतो.

(2) नफा प्रत्यक्ष मिळाल्याखेरीज त्याची नोंद पुस्तकात करु नये.

(3) शिल्लक मालाची किंमत, खरेदी किंमत आणि विक्री किंमत यापैकी जी अधिक असेल ती घ्यावी.

(4) वरील सर्व

---

170. खालील माहितीच्या आधारे 31 डिसेंबर 2014 रोजी संपणाऱ्या वर्षामध्ये एका शैक्षणिक संस्थेला सभासद वर्गणीची रक्कम किती प्राप्त झाली ते सांगा.

2014 या वर्षामध्ये रोख खात्यावर एकूण नावे रक्कम ₹ 40,000

वर्ष 2013 मधील अदत्त वर्गणी रक्कम ₹ 4,000

वर्ष 2014 मधील अदत्त वर्गणी रक्कम ₹ 7,000

वर्ष 2014 मधील पूर्वप्राप्त वर्गणी रक्कम ₹ 2,000

वर्ष 2013 मधील पूर्वप्राप्त वर्गणी रक्कम ₹ 3,000

(1) ₹ 54,000 (2) ₹ 44,000 (3) ₹ 34,000 (4) ₹ 47,000

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**171.** संपत्तीचा घसारा आकारण्याचा/चे उद्देश खालीलपैकी कोणता/कोणते ?

(a) संपत्तीची खरी किंमत दर्शविण्यासाठी

(b) योग्य निव्वळ नफा किंवा तोटा काढण्यासाठी

(c) घसाऱ्यामुळे होणारे नुकसान संपत्तीच्या कार्यकाळात विभागण्यासाठी

(d) वरील सर्व

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) आणि (c) (2) (a) आणि (b) (3) (b) आणि (c) (4) (d)

---

**172.** जर एखाद्या व्यावसायिकाची वर्षाअखेरीस भांडवलाची शिल्लक रक्कम ₹ 7,00,000 आहे. त्याने व्यवसायामध्ये पुन्हा ₹ 5,00,000 गुंतवले आहेत. त्याची रोख उचल रक्कम ₹ 8,00,000 आहे. त्याला व्यवसायामध्ये ₹ 1,00,000 तोटा झाला आहे तर त्या व्यावसायिकाची आरंभीची भांडवल रक्कम किती ?

(1) ₹ 12,00,000 (2) ₹ 6,00,000 (3) ₹ 20,00,000 (4) ₹ 11,00,000

---

**173.** नावलौकिक (Goodwill) कोणत्या स्वरूपाची संपत्ती आहे ?

(1) तरल संपत्ती (2) अमूर्त संपत्ती (3) अस्थिर संपत्ती (4) नामधारी संपत्ती

---

**174.** महसुली प्राप्तीमध्ये खालीलपैकी कोणाचा समावेश उचित ठरणार नाही ?

(1) आजीवन सभासद शुल्क (2) सभासद वर्गणी

(3) गुंतवणूकीवर प्राप्त व्याज (4) वरील सर्व

---

**175.** अदत्त व्यय आणि पूर्वप्राप्त उत्पन्न रक्कम ताळेबंदामध्ये __________ बाजुला दर्शविली जाते.

(1) नावे (2) जमा (3) संपत्ती (4) देयता

---

**176.** जर आरंभीचा शिल्लक मालसाठा ₹ 1,50,000; एकूण खरेदी ₹ 4,50,000; मजुरी खर्च ₹ 60,000; वर्षाअखेरीचा मालसाठा ₹ 1,20,000 आणि ढोबळ नफा प्रमाण विक्रीच्या 1/7 इतका आहे तर विक्रीची किंमत किती ?

(1) ₹ 6,17,142 (2) ₹ 5,40,000 (3) ₹ 5,60,000 (4) ₹ 6,30,000

---

**177.** खालीलपैकी कोणत्या खात्याबरोबर ताळेबंद असलाच पाहिजे असे बंधन **नाही** ?

(1) आय-व्यय खाते (2) उत्पन्न व खर्च खाते

(3) नफा तोटा खाते (4) वरील सर्व

---

**178.** स्थिती विवरण पत्रक तयार करताना आकस्मिक देणी __________ म्हणून दाखविली जाते.

(1) देयता (2) संपत्ती (3) तळ टिप (4) देय निधि

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**179.** द्विनोंदी पद्धतीचे खालीलपैकी कोणते महत्त्वाचे उद्दिष्ट सांगता येईल ?

(1) व्यवहारांची तात्पुरती नोंद घेणे.

(2) व्यवहाराची नोंद एकाच ठिकाणी करणे.

(3) लबाडी व अफरातफरीच्या व्यवहाराला आळा घालणे.

(4) वरीलपैकी एकही नाही.

---

**180.** तेरीज पत्रकामध्ये दर्शविण्यात आलेल्या पूर्वदत्त विमा हप्त्याची रक्कम ________ येथे नोंदविली जाते.

(1) नफा तोटा पत्रक आणि ताळेबंद  (2) फक्त नफा तोटा खात्याची नावे बाजू

(3) फक्त ताळेबंदातील संपत्तीची बाजू  (4) नफातोटा खाते नावे बाजू आणि ताळेबंद संपत्तीची बाजू

---

**181.** घसाऱ्याच्या प्र्हासन आधिक्य पद्धतीबाबत खालीलपैकी कोणते विधान **असत्य** आहे ?

(1) घसाऱ्याची रक्कम दरवर्षी सारखीच असते.

(2) घसारा संपत्तीच्या घटीत मूल्यावर आकारला जातो.

(3) घसाऱ्याची रक्कम दर वर्षी कमी कमी होत जाते.

(4) वरीलपैकी एकही विधान योग्य नाही.

---

**182.** व्यक्तीगत खात्यास खालीलपैकी नेमके कोणते विधान लागू पडते ?

(a) व्यवसायाला किती उत्पन्न मिळाले हे समजून येते.

(b) विशिष्ट बाबीसाठी व्यवसायाने किती खर्च केला हे समजते.

(c) व्यवसायामध्ये असलेल्या मालमत्तेची किंमत समजून येते.

(d) व्यक्तिगत खात्याच्या शिलकेवरून व्यवसायास 'येणे' किंवा 'देणे' असलेल्या रकमेची माहिती मिळते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a)  (2) (a) आणि (b)  (3) (c) आणि (d)  (4) फक्त (d)

---

**183.** खरेदी पुस्तकामध्ये पुढीलपैकी कोणता व्यवहार नोंदविण्यात येत नाही ?

(1) मालाच्या उधार खरेदीचे व्यवहार  (2) नगदी खरेदीचे व्यवहार

(3) व्यापारी मालाच्या खरेदीचे व्यवहार  (4) वरीलपैकी एकही नाही.

---

**184.** ढोबळ नफा (Gross Profit) खालीलपैकी कोणत्या खात्यात दाखवला जातो ?

(1) व्यापार खाते  (2) नफा तोटा खाते  (3) ताळेबंद  (4) वरील सर्व

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**185.** ताळेबंदाच्या बाबतीत खालीलपैकी **अचुक** विधान कोणते ?

(a) व्यवसायाची आर्थिक सधनता अचुकतेने समजते.

(b) व्यवहाराचे नियोजन व नियंत्रण करता येते.

(c) व्यवसाय खर्च व उत्पन्नाची माहिती मिळविता येते.

(d) व्यवसायाला झालेला ढोबळ नफा वा नुकसान शोधून काढणे शक्य होते.

**पर्याय उत्तरे :**

(1) फक्त (a) (2) (a) आणि (b) (3) (a), (b) आणि (c) (4) (a), (b) आणि (d)

---

**186.** खालीलपैकी कोणत्या खात्यात दोन्ही भांडवली व चालू महसूली प्राप्ती व खर्चाचा समावेश होतो ?

(1) आय-व्यय खाते (2) उत्पन्न व खर्च खाते

(3) नफा-तोटा खाते (4) वरील सर्व

---

**187.** खालीलपैकी कोणते विधान हिशेबशास्त्राच्या संदर्भात **असत्य** आहे ?

(1) हिशेबशास्त्रात प्रत्येक व्यवहाराचे मोजमाप रकमेत करण्यात येते.

(2) ज्याचे मोजमाप रकमेत करता येत नाही असे व्यवहार हिशेबशास्त्रातून वगळले जातात.

(3) प्रत्येक आर्थिक व्यवहाराची नोंद रोजकिर्दमध्ये करण्यात येते.

(4) सर्व आर्थिक व्यवहारांचे वर्गीकरण करण्यात येते.

---

**188.** व्यापारी व्यवहारांचा जमाखर्च लिहण्याची द्विनोंद पद्धत __________ यांनी शोधून काढली.

(1) ल्युका डी बर्गो पॅसिओली (2) ल्युका सी बोर्गा पॅसिलो

(3) ल्युका बी बर्गे पॅसीलो (4) ल्युका एसी बर्गी पॅसिले

---

**189.** अव्यापारी संस्था खालीलपैकी कोणते खाते बनवित **नाही** ?

(1) उत्पन्न व खर्च खाते (2) नफा तोटा खाते

(3) आय-व्यय खाते (4) ताळेबंद

---

**190.** व्यापारविषयक व्यवहारांच्या मुळनोंदी ज्या पुस्तकामध्ये केल्या जातात त्या पुस्तकाला _________ म्हणतात.

(1) टिपन वही (2) तेरीज पत्रक (3) रोज किर्द (4) खाते वही

---

**191.** खालीलपैकी कोणता कर प्रत्यक्ष कर आहे ?

(1) विक्रीकर (2) मुल्यावर्धित कर (3) उत्पादन शुल्क (4) संपत्ती कर

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**



www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**192.** बँकेचे डी-मॅट खाते कोणत्या कारणासाठी वापण्यात येते ?

(1) बँकेचे सर्वसामान्य कार्य (2) चालु खाते

(3) दुय्यम ठेवी (4) शेअर्स-खरेदी विक्री

---

**193.** मुळ मुल्यावर्धितकर कायद्यात खालील कुठला कर काढुन टाकण्यात आला आहे ?

(1) खरेदी कर (2) कार्यकंत्राट कर (3) वस्तुवापर कर (4) मोटरस्पिरिट कर

---

**194.** खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(a) जागतिकीकरण हा शब्द आर्थिक प्रयोजनासाठी देशादेशामधील सीमेवरील अडथळे दूर करुन आंतरराष्ट्रीय व्यापाराचे रूपांतरण अंतर्गत व्यापारात करून तुलनात्मक लाभ आणि निरपेक्ष लाभ प्राप्त करण्याची प्रक्रिया व्यक्त करतो.

(b) जागतिकीकरण व आंतरराष्ट्रीयीकरण हे वेगवेगळ्या अर्थाचे शब्द आहेत.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर पण (b) चूक (2) (b) बरोबर पण (a) चूक

(3) (a) आणि (b) दोन्ही बरोबर (4) (a) आणि (b) दोन्ही चूक

---

**195.** पुर्वीच्या कायद्यातील कोणता/कोणते करकायदा/करकायदे मुल्यावर्धित कर कायद्यात समाविष्ट करण्यात आला/आले आहेत ?

(1) ऐषआराम करकायदा

(2) व्यवसायकर कायदा

(3) मोटरवाहन प्रवेश कर कायदा

(4) कार्यकंत्राटकर कायदा, वस्तुवापर कर कायदा, मुंबई मोटर स्पिरिट कर कायदा

---

**196.** नवीन आर्थिक धोरण 1991 __________ या पंतप्रधान व वित्तमंत्र्याच्या कालावधीत अंमलात आणल्या गेल्या.

(1) श्री. नरसिंहराव व डॉ. मनमोहन सिंग (2) डॉ. मनमोहन सिंग व श्री. चिदंबरम

(3) श्री. अटलबिहारी बाजपेयी व श्री. जसवंत सिंह (4) श्री. राजीव गांधी व श्री. शंकरराव चव्हाण

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

**197.** प्रस्तावित वस्तू व सेवा कायद्यामधून खालील करास वगळण्यात येणार आहे.

(a) मुल्यावर्धित कर/मुंबई विक्रीकर (b) केंद्रिय विक्रीकर

(c) केंद्रिय उत्पादन शुल्क कर (d) सरचार्ज

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (b) बरोबर (2) फक्त (b) आणि (c) बरोबर

(3) फक्त (a), (b), (c) बरोबर (4) (a), (b), (c), (d) सर्व बरोबर

---

**198.** खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत?

(a) जागतिकीकरणामुळे भारताच्या जागतिक निर्यात वाट्यात नगण्य वाढ झाली आहे.

(b) जागतिकीकरणामुळे भारताच्या आयातीपेक्षा निर्यातीमध्ये वाढ झाली आहे.

(c) जागतिकीकरणामुळे भारताच्या आयातीत निर्यातीपेक्षा वाढ झाली त्यामुळे भारताच्या व्यापारतोलात सातत्याने तुट आली आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) आणि (c) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) (a), (b), (c) तिन्ही बरोबर (4) (a), (b), (c) तिन्ही चूक

---

**199.** मुल्यावर्धितकर कायद्यानुसार नोंदणीसाठी अटीशिवाय उलाढाल मर्यादा किती आहे?

(1) ₹ 1,00,000 (2) ₹ 5,00,000 (3) ₹ 8,00,000 (4) ₹ 10,00,000

---

**200.** जागतिक व्यापार संघटनेच्या मंत्रीस्तरीय संमेलनाच्या आयोजनाविषयी पुढीलपैकी कोणता पर्याय **योग्य** आहे?

(1) एक वर्षातून दोन वेळा व पहिले संमेलन 1996 मध्ये सिंगापूर येथे झाले.

(2) एक वर्षातून दोन वेळा व पहिले संमेलन 1996 मध्ये जिनिव्हा येथे झाले.

(3) दोन वर्षातून एक वेळ व पहिले संमेलन 1995 मध्ये सिएटल येथे झाले.

(4) दोन वर्षातून एक वेळ व पहिले संमेलन 1996 मध्ये सिंगापूर येथे झाले.

---

- o 0 o -

**कच्च्या कामासाठी जागा** / SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial

## सूचना — ( पृष्ठ 1 वरून पुढे.... )

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव **खालीलप्रमाणे** प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

SEAL

www.mpscmaterial.com follow us @mpscmaterial on FB, INSTA and t.me/mpscmaterial